अचानक नाहीशा झालेल्या व ठावठिकाणा माहित नसलेल्या शासकीय कर्मचारी / निवृत्तीवेतनधारक यांच्या कुटुंबियांना कुटुंबनिवृत्तीवेतन व उपदान मंजूर करणेबाबत
बेपत्ता श्री. विश्वास यादव मगर, पोलीस शिपाई.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः कुनिवे-०६१५/प्र.क्र.७९/आस्था-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, नवीन प्रशासकीय भवन, १२ वा मजला
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २३ जून, २०१५

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांकः वित्त विभाग, क्रमांक : सेनिवे-१०३९/४९१/सेवा-४, दि. ५.७.१९९१.
२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/३९/४२ / संकीर्ण-१/०१४, दि. २.०६.२०१५.
३) पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचे कार्यालयाचे पत्र क्र.लेखा/१२०/पेन्शन/२०१४/, दि. २८.०५.२०१५.

प्रस्तावना :

श्री. विश्वास यादव मगर, पोलीस शिपाई हे पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचे आस्थापनेवर कार्यरत होते. ते दि. ३०.११.२०११ पासून बेपत्ता आहेत. श्री. विश्वास यादव मगर, पोलीस शिपाई बेपत्ता झाल्याची खबर तोफखाना पोलीस स्टेशन अहमदनगर येथे प्रथम खबरी अहवाल दि. १९.०१.२०१२ रोजी दाखल केला असून त्याची नोंद मिसिंग रजिस्टर नंबर ९/१२ वर आहे. त्यानुषंगाने तोफखाना पोलीस स्टेशनने शोध घेतला परंतु बेपत्ता श्री. विश्वास यादव मगर मिळून येत नसल्याबाबतचा अहवाल दि. १९.१०.२०१२ च्या पत्रान्वये पोलीस निरिक्षक, तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर यांनी दिलेला आहे.

२. श्री. विश्वास यादव मगर हे बेपत्ता होऊन एक वर्ष पूर्ण झाले आहे. त्यांच्या पत्नी श्रीमती सुरेखा ऊर्फ कविता विश्वास मगर यांनी कुटुंब निवृत्तीवेतन मंजूर करण्याची विनंती केली आहे. श्री. विश्वास यादव मगर यांच्या सेवापुस्तकात त्यांच्या पत्नी श्रीमती कविता विश्वास मगर यांचे नामनिर्देशन केले आहे. परंतु पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांच्या दि. २८.०५.२०१४ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावात श्री. मगर यांच्या पत्नीचे नांव श्रीमती सुरेखा ऊर्फ कविता विश्वास मगर असे दिले असून कुटुंब निवृत्तीवेतन मंजुरीच्या विहित नमुन्यातील फॉर्मवर श्रीमती सुरेखा विश्वास मगर असे नांव दिले

आहे. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी त्यांच्या दि. १६.१०.२०१४ च्या पत्रान्व्ये बेपत्ता श्री. मगर यांची वारस पत्नी श्रीमती सुरेखा ऊर्फ कविता विश्वास मगर या दोन नांवे असलेल्या व्यक्ती ह्या एकच असल्याबाबत श्रीमती सुरेखा विश्वास मगर यांनी भारतीय गैरन्यायिक रु. १००/- च्या पत्रावर लेखी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. बेपत्ता श्री. विश्वास यादव मगर यांच्या पत्नी श्रीमती सुरेखा ऊर्फ कविता विश्वास मगर यांना कुटुंब निवृत्तीवेतन व उपदान मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी क्षतीपूर्ती बंधपत्र, प्रथम खबरी अहवाल, पोलीस स्टेशनचे अंतिम अहवाल इ. कागपत्रांसह दाखल केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय:

श्री. विश्वास यादव मगर हे दि. ३०.११.२०११ रोजी बेपत्ता झाले असून त्यास १ वर्ष् झाल्याने श्रीमती सुरेखा ऊर्फ कविता विश्वास मगर यांनी कुटुंब निवृत्तीवेतनाची मागणी केली आहे. यास अनुसरुन बेपत्ता श्री. विश्वास यादव मगर, पोलीस शिपाई यांच्या पत्नी श्रीमती सुरेखा ऊर्फ कविता विश्वास मगर यांना कुटुंब निवृत्तीवेतन व उपदान प्रदान करण्यास शासन मंजूरी देत आहे. तथापि, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१०८९/४९१/सेवा-४, दि. ५.७.१९९१ अन्वये क्षतिपूर्ती बंधपत्र परिपूर्ण करुन व आवश्यक बाबींची पूर्तता करुन घेण्याची खबरदारी पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी घ्यावी.

सदर शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१०८९/४९१/सेवा-४, दि. ५.७.१९९१, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१०८९/४९१/सेवा-४, दि. ७.१०.१९९३, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१०९४/१५६/सेवा-४, दि. २६.०६.१९९५ व शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१०००/प्र.क्र. ८३/सेवा-४, दि. ३.०७.२००० यास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६२३१६०८५६७९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Yuvraj Bayaji Ajetrao

Digitally signed by Yuvraj Bayaji Ajetrao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Yuvraj Bayaji Ajetrao
Date: 2015.06.23 16:10:31 +05'30'

(युवराज अजेटराव)

अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस अधिक्षक,अहमदनगर.

३. बेपत्ता श्री. विश्वास यादव मगर यांचे पत्नीस पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचे कार्यालयामार्फत.

४. महालेखापाल (लेखा व हकदारी), महाराष्ट्र,१/२, मुंबई/नागपूर.

५. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय अहमदनगर.

६.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, अहमदनगर.

७.निवड नस्ती (आस्था-१).